FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154195

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ......, पहिली खबर क्र. FIR No 36, वर्ष Year 2022 दिनांक Date 13/10/2022

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7, 7(अ)
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ......, तारीख पासून Date from Oct. 2021 ते 23/12/2021, वेळ Time ......, तारीख पर्यंत Date to ......, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पों. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 16/12/2021 वेळ Time ......
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 16/22, तारीख Date 13/10/22 वेळ Time 10.30

4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ......, ठिकाणाचे नंबर ......, गल्ली ......, रस्त्याचे नाव ......
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name प्रविणा कनगोसावी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name पांडुरंग
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 36 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8975752338
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation पोलीस निरिक्षक
   (g) धर्म Religion ...... जात Caste ...... पोटजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. ......, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता याच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री. अच्युत शिखरे, महा कक्ष अधिकारी, मंत्रालय

यातील फिर्यादी श्री. प्रविण कळगोसावी वय ३८ वर्षे पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने त्यांचा जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखीत करण्यात आला असुन तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

विद्या जाधव
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

13/10/2022

फिर्याद दिनांक–१३/१०/२०२२

मी, प्रविण पांडुरंग बनगोसावी, वय ३६ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, सरकारतर्फे फिर्याद लिहून देतो की,

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे सप्टेंबर २०१९ पासुन 'पोलीस निरीक्षक' या पदावर कार्यरत आहे.

मी, दिनांक १४/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे कर्तव्यावर हजर असताना, तक्रारदार श्री. डुरेडं आनंद डीसोझा, वय ४३ वर्षे, धंदा– व्यवसाय (प्रिन्टींग टेक्नोलॉजी), पत्ता:– फ्लॅट नं. ए–११, बीचवे अपार्टमेट कॉ.ऑप. हौ. सोसायटी लि., सी प्रिन्सेस हॉटेलच्या समोर, जुहू तारा रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई यांनी मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे कार्यालयात समक्ष हजर राहुन लोकसेवक अच्युत शिधाए यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत लेखी तक्रारअर्ज दिला. मा.अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी सदर तक्रारीची पडताळणी व पुढील कारवाई करण्याकरीता ला.प्र.वि. मुंबई विभागाचे स.पो.आ. श्रीमती उज्वल वैद्य यांची पर्यवेक्षक अधिकारी व माझी तपासी अधिकारी म्हणुन नेमणुक केली तसेच सदर तक्रारीची पडताळणी व पुढील कारवाई करण्याबाबत आदेश दिले.

तक्रारदार यांच्या तक्रारीतील थोडक्यात मजकूर पुढीलप्रमाणे तक्रारदार श्री. डुरेडं डिसोझा यांचे वडील श्री. जोसेफ डिसोझा हे बीचवे अपार्टमेट कॉ.ऑप. हौ. सोसायटी लि., सी प्रिन्सेस हॉटेलच्या समोर, जुहू तारा रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई या सोसायटीचे अध्यक्ष आहेत. सदर सोसायटी ही सन २०१४ ही आशा कॉलनी कॉ.ऑप. सोसायटी यापासुन विभक्त झाली आहे. नमुद आशा कॉलनी सोसायटीने सहकार मंत्रालयामध्ये अपीलमध्ये गेले होते. सदर अपीलाची सुनावणी माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये झाली असुन सदरबाबत अंतिम आदेश प्रंलबित आहे. नमुद सुनावणीच्या दिवशी सुनावणीचा अंतिम आदेश बीचवे सोसायटीच्या बाजुने देण्याकरीता तेथे काम करणारे लोकसेवक श्री. अच्युत शिधाये यांनी तक्रारदार यांचे समक्ष त्यांचे वडीलांना रू.५,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली होती. त्यानंतर नमुद अपीलाबाबतचे आदेश अदयापपावेतो तक्रारदार यांच्या सोसायटीस मिळालेले नाहीत. तक्रारदार, त्यांचे वडील व नमुद सोसायटीतील सभासदांना लोकसेवकास लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांचे वडील हे नमुद सोसायटीचे अध्यक्ष असल्याने त्याच्या व सोसायटीच्या वतीने तक्रारदार श्री. डुरेडं डिसोझा यांनी दिनांक १४/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात समक्ष येवून स्वहस्ताक्षरातील इंग्रजीतुन लिहीलेला तक्रार अर्ज दिलेला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयास प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कारवाईत पंच कर्तव्य करण्याकरीता राखीव ठेवणेबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, दहीसर (पश्चिम) यांना पत्र देवून राखीव पंच उपलब्ध करून देण्याची विनंती केली असता त्यांनी पंच १) श्री.संदीप अर्जुन भालचिम, पद – लिपीक टंकलेखक, व २) श्रीमती आरती महादेव रसाळ, पद – लिपीक टंकलेखक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कांदरपाडा, दहीसर पश्चिम, मुंबई हे पंच म्हणून उपलब्ध करुन दिले. वरील

समक्ष,

Jadhav

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

13/10/2022
(प्रविण बनगोसावी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

नमूद दोन्ही पंच ला.प्र.वि, मुंबई विभाग, मुंबई येथील कार्यालयात दिनांक १४/१२/२०२१ रोजी सकाळी ११:५० वा. दरम्यान हजर झाले.

सदरवेळी तक्रारदार श्री. डुरेडं डिसोझा यांना पंचांची ओळख शासकीय पंच अशी करून देवुन तक्रारदार श्री. डुरेडं डिसोझा यांनी केलेल्या तक्रारीची माहिती देवून, नमुद मजकुराचा तक्रार अर्ज वाचावयास दिला. पंचांनी सदर तक्रारअर्ज वाचुन त्यावर सह्या केल्या व आम्ही समक्ष म्हणून सही केली आहे.

तक्रारदार श्री. डुरेडं डिसोझा यांनी केलेल्या लेखी तक्रारीच्या अनुशंगाने आम्ही दि.१४/१२/२०२१ व दिनांक १५/१२/२०२१ रोजी पडताळणीचे आयोजन केले. त्यामध्ये तक्रारदार श्री. डिसोझा व दोन्ही पंच यांचे व्यक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मॉडेल क्र. ICD-PX-333 Serial No. 5021781 मधील सॅनडिस्क कंपनीचे ८ जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी. कार्ड क्र. 0102XP3320JE मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. सदर दोन्ही दिवशी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. डिसोझा यांची नमुद लोकसेवकाची समक्ष भेट झाली नाही तसेच फोनवर देखील संपर्क झाला नाही. त्यामुळे नमुद दिवशी पडताळणी कार्यवाही स्थगित करण्यात आल्या. त्यानंतर पुन्हा सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्याचे सर्वानुमते मते ठरविण्यात आले.

त्यांनतर तक्रारदार श्री. डिसोझा यांचे अपिलासंदर्भातील त्यांचे वकीलांनी तक्रारदार यांना सांगितले की, लोकसेवक शिधाये यांनी दिनांक २३/१२/२०२१ रोजी त्याच्या कार्यालयात भेटण्यास बोलविले आहे तसे तक्रारदार श्री. डिसोझा यांनी आम्हास कळविले.त्यानुसार आम्ही दिनांक २३/१२/२०२१ रोजी पडताळणी कार्यवाईचे आयोजन करण्यात आले.

आमचे सुचनेनुसार दिनांक २३/१२/२०२१ रोजी लाप्रवि कार्यालयात १०.४५ वाजेच्या सुमारास तक्रारदार श्री. डिसोझा हे हजर झाले. सदरवेळी आमचे सोबत पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. श्रीमती वैद्य हयाउपस्थित होत्या तसेच दोन्ही शासकीय पंचदेखील हजर होते. त्यानंतर तक्रारदार श्री. डिसोझा व दोन्ही पंच यांचे व्यक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मॉडेल क्र. ICD-PX-333 Serial No. 5021781 मधील सॅनडिस्क कंपनीचे ८ जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी. कार्ड क्र. 0102XP3320HM मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व पोलीस पथकातील अधिकारी व पडताळणी पथकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून बाहेर पडून कार्यालयाच्या आवारात उभी असलेल्या शासकीय वाहनाने लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ (मंत्रालयाजवळ)जावुन गोपनियरित्या थांबून राहिलो.लाप्रवि कार्यालयातुन लोकसेवकाच्या कार्यालयाच्या दिशेने जात असतानाच दरम्यान तक्रारदार यांना फोनवर एका व्यक्तीने कॉल करून मंत्रालयाजवळ आल्यावर त्यांना कॉल करण्यास सांगुन गेटपास बनवुन देणार असल्याचे सांगितले होते.त्यानंतर आम्ही डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री. डिसोझा यांना लावल्यानंतर तक्रारदार यांचेसह पंच श्री.भालचिम यांच्यासह लोकसेवकास भेटण्यासाठी मंत्रालय, मुंबई च्या गार्डन गेट च्या दिशेने पाठविले.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. डिसोझा व पंच श्री. भालचिम हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी निघुन आले.त्यानंतर तक्रारदार यांचे डीजीटल वॉइस रेकॉर्डर आम्ही काढुन बंद करुन आमच्या जवळ ठेवले व तक्रारदार व पंच यांना काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी आम्हास सांगितले की, ते व पंच हे मत्रालयाच्या गार्डन गेट

समक्ष,

Jadhav
( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Borges 13/10/2022
(प्रविण मनगोसावी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

ने च्या दिशेने गेले तेथे पोहचल्यानंतर तक्रारदार श्री. डिसोझा यांनी पास देण्या–या व्यक्तीस फोन करुन गार्डन गेट येथे आलो असल्याचे सांगितले त्यावेळी त्या व्यक्तीने ते गेटजवळ येत असल्याचे सांगितले. बराच वेळ झाला तरी ती व्यक्ती न आल्याने तक्रारदार यांनी पुन्हा त्यास कॉल केला केला असता, त्याने तो येत असल्याचे सांगितले. त्यांनतर त्या व्यक्तीने तक्रारदार श्री. डिसोझा यांना समोरुन कॉल केला व तक्रारदार यांना मंत्रालयाच्या गार्डन गेटच्या प्रवेश द्वाराजवळ बोलावले.

त्यानुसार तक्रारदार तेथे गेले असता, त्या व्यक्तीने त्यांचे नाव श्री. खांडेकर असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यास त्याचेसोबत अजुन एक व्यक्ती असल्याचे सांगितले असता, श्री. खांडेकर यांनी तक्रारदार यांस सांगितले की, तुम्ही आगोदर शिधाये साहेबाजवळ जावा त्यांनतर दुसऱ्या व्यक्तीचे पाहु. त्यानंतर तक्रारदार श्री. डिसोझा हे व्यक्ती नामे श्री. खांडेकर यांचेसोबत मंत्रालयात प्रवेश करून लिफ्टने सहा मजल्यापर्यत जावुन तेथुन सातव्या माळयावर चालत गेले. त्यानंतर श्री.खांडेकर यांनी तक्रारदार श्री. डिसोझा यांना लोकसेवक शिधाये यांच्या कार्यालयात घेवुन गेले व त्यांची भेट घालुन दिली. त्यावेळी तक्रारदार श्री. डिसोझा व लोकसेवक श्री. शिधाये यांच्यामध्ये त्यांच्या प्रलंबित कामासंदर्भात चर्चा झाली. तक्रारदार श्री.डिंसोझा यांनी लोकसेवक श्री.शिधाये यांना विचारले की, सदर आदेशावर कोणाची सही असेल त्यावेळी त्यांनी सांगितले की, त्यावर श्री.संपत डावखर यांची सही असेल.त्यानंतर लोकसेवक शिधाये यांचेशी चर्चा करीत असताना त्यांनी तक्रारदार श्री. डिसोझा यांना विचारले की, 'तुमच्या बाजुने निकाल दिला तर त्यांचे काहीतरी केले पाहिजे व लोकसेवक श्री. शिधाये यांनी एका कागदावर ५०००००० असे लिहीले, त्यावर तक्रारदार यांनी पाच लाख असे बोलले, त्यावर लोकसेवक श्री. शिधाये 'तेच तर सांगत आहे' असे बोलले. त्यांना तक्रारदार श्री. डिसोझा यांनी सदर लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली असता, लोकसेवक श्री. शिधाये बोलले की, 'साहेब अधिवेशनसाठी गेले आहेत ते येईपर्यत थांबा'. त्यानंतर तक्रारदार श्री. डिसोझा हे तेथेच थांबुन राहिले. त्यादरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवकास सांगुन पंच यांचा पास बनवुन व्यक्ती श्री.खांडेकर यांचे मार्फतीने पंच श्री.भालचिम यांना त्यांचे जवळ घेवुन आले. त्यावेळी तक्रारदार यांनी पंच श्री. भालचिम यांचे समक्ष लोकसेवक शिधाये यांना लाचेची रक्कम कमी करण्यासाठी बोलले असता, लोकसेवक श्री. शिधाये यांनी 'साहेबाकुडुन लाचेची रक्कम कमी करावयाची असल्याचे त्यांनी त्यांचे स्वत:साठी रू.२०,०००/– रुपये इतकी लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार श्री. डिसोझा व पंच श्री. भालचिम हे लोकसेवक डावखर यांची वाट पाहत तेथेच थांबुन राहिले. त्यानंतर बराच वेळ लोकसेवक श्री. डावखर साहेब आले नसल्याने तक्रारदार श्री. डिसोझा हे निघुन येणार होते, त्यावेळेस लोकसेवक श्री. शिधाये यांनी 'शेवट किती सांगु साहेबाला' असे विचारले असता, मी त्यांना 'तीन लाख' असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. शिधाये यांनी साहेबासोबत बोलुन तक्रारदार यांना कॉल करून सांगतो असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. शिधाये यांनी त्यांचे स्वत:साठी रू. २०,०००/– इतकी लाचेची मागणी केली असल्याबाबत मला तक्रारदार यांनी सांगितले.

त्यानंतर आम्ही व सपोआ वैद्य यांनी लोकसेवक श्री. शिधाये यांच्या समक्ष भेटी दरम्यान तक्रारदार श्री. डिसोझा यांचेसह ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण काळजीपुर्वक ऐकले असता,त्यामध्ये लोकसेवक श्री. अच्युत

समक्ष,

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(प्रविण बनगोसावी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

शिधाये यांनी तक्रारदार श्री. डिसोझा यांचेकडे त्यांचे रहिवासी सोसायटीचे संदर्भात केलेल्या अपिलासंदर्भात तक्रारदार यांचे सोसायटीचे बाजुनं अंतिम आदेश देण्याकरीता त्यांचे वरिष्ठ अधिकारीयांचेकरीता रू. ५,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती ठरलेली रक्कम रू.३,००,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेबाबत वरिष्ठ अधिकारी यांना विचारून तक्रारदार यांना कळवितो असे सांगितले. तसेच लोकसेवक श्री. अच्युत शिधाये यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडुन लाचेची रक्कम कमी करून घेण्याकरीता स्वत:करीता रूपये २०,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर यातील तक्रारदार श्री. डिसोझा यांना दिनांक ०१/०२/२०२२ रोजी पुढील कार्यवाहीकरीता लाप्रवि कार्यालयात बोलाविण्यात आले, परंतु तक्रारदार यांनी त्यांचे वडील आजारी असल्याचे कारण सांगत पुढील कार्यवाहीकरीता काही दिवसांचा कालावधी मागितला. त्यानंतर दिनांक ०३/०२/२०२२, २३/०२/२०२२, २५/२/२०२२, ०७/०३/२०२२, ०६/०६/२०२२, १४/०६/२०२२ रोजी वारंवार दुरध्वनीद्वारे/मोबाईलद्वारे संपर्क करून देखील तक्रारदार श्री. डिसोझा ब्युरो कार्यालयात येण्यास टाळत आहेत. तक्रारदार हे पुढील कार्यवाहीसाठी येत नसल्याने व कॉल देखील स्विकारत नसल्याने दिनांक १७/०६/२०२२ रोजी खासदूतामार्फत लेखी समजपत्र घेवुन तक्रारदार यांच्या निवासस्थानी पाठविले असता तक्रारदार यांचे घर बंद स्थितीत आढळुन आले. त्यानंतर देखील तक्रारदार यांनासर्वातोपरी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, तक्रारदार यांच्याशी संपर्क झाला नाही.

त्यामुळे आम्ही स्वत: सरकारतर्फे फिर्यादिदेवुन तक्रारदार श्री. डुरेंड आनंद डिसोझा यांनी दि. १४/१२/२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २३/१२/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. शिधाये यांनी तक्रारदार यांच्या सोसयटीच्या वतीने केलेल्या अपीलासंदर्भात तक्रारदार यांच्या बाजुने निकाल देण्यासाठीत्याचे वरिष्ठ अधिकारीयांचेकरीता कायदेशीर परीश्रमीकाखेरीज परितोषण म्हणून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने रू.५,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली.तसेच लोकसेवक शिधाये यांनी वरिष्ठ अधिकारी यांचेवर वैयक्तीक प्रभाव टाकुन लाचेची रक्कम कमी करून देण्यासाठी तक्रारदार यांचे कडुन रु २००००/– इतक्या लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणूनमाझी लोकसेवक अच्युत शिधाये,सहा.कक्ष अधिकारी,मंत्रालय यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, ७(अ) अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणंप्रमाणे मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता, ती बरोबर व खरी आहे.

ही फिर्याद लिहून दिली सही
दिनांक १३/१०/२०२२

समक्ष,

( विद्या जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

13/10/2022
(प्रविण वनगोसावी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तक्रारदाराकडून ........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ — ........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ — ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ — ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक श्री अच्युत शिधाये सह. कक्ष अधिकारी, सहकार मंत्रालय मुंबई यांनी तक्रारदार श्री दुर्गेश डिसोझा यांना त्यांच्या सोसायटीच्या वतीने केलेल्या अपील संदर्भात तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देण्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांचेकरिता परिश्रमायोग्य पारितोषण म्हणून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने रु 5,00,000/- इतक्या रक्कमेची मागणी केली तसेच आलोसे शिधाये यांनी वरिष्ठ अधिकारी यांचेवर वैयक्तिक प्रभाव टाकून लाचेची रक्कम कमी करून देण्याकरिता तक्रारदार यांचेकडून रु. 20,000/- इतक्या लाचेची रक्कम मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणून फिर्यादी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने गु.र.क्र. 36/22 कलम 7, 7(अ) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो नि विद्या जाधव ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

(signature) 13/10/2022

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

(signature)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name विद्या जाधव

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting ला.प्र.वि. मुंबई

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**